# उड्डाणपुलावर अपघात; तरुणाचा मृत्यू

**नाशिकरोड । प्रतिनिधी**



येथील बिटको चौकातील उड्डाणपुलावर सिन्नर फाट्याहून बिटको चौकाकडे येणाऱ्या एका तरुणाला ट्रकची ठोस बसल्याने सदरचा तरुण जागीच ठार झाला. हा अपघात खड्डे चुकवण्याच्या नादात झाला. त्यामुळे एकप्रकारे या तरुणाचा खड्ड्याने बळी घेतला असल्याचा आरोप वाहन धारकांकडून केला जात आहे.

सिन्नर फाटा खर्जुल मळा येथील २९ वर्षीय अमित राजेंद्र मिश्रा यांचा सकाळी कामावर जात असताना दुर्दैवी अपघातात मृत्यू झाला. भरधाव वेगात असलेल्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अमित मिश्रा हे इंदिरानगर येथील डब्ल्यूएनएस या कंपनीत काम करत होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते आपल्या दुचाकीवरून उड्डाणपुलावरून दत्त मंदिराच्या दिशेने निघाले होते. यावेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अमित मिश्रा हे विवाहित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, लहान मुलगा, आई-वडील आणि भाऊ असा परिवार आहे.

या अचानक झालेल्या अपघातामुळे त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. अपघातानंतर ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत. अपघात झाल्यानंतर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी जमली होती तसेच वाहतूकसुद्धा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली होती. अपघाताचे वृत्त समजताच नाशिकरोड पोलीस घटनास्थळी दाखल झाले व त्यांनी ट्रक चालकाला ट्रकसह ताब्यात घेतले. त्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# अपघाताला कारणीभूत ठरलेले खड्डे बुजवा

## युवासेना, सेवादल ब्लॉक कॉंग्रेसचे निवेदन

**नाशिकरोड । प्रतिनिधी**



येथील सिन्नर फाटा पुलावर अपघाताला कारणीभूत ठरलेले खड्डे त्वरित बुजवावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाच्या युवासेनेच्या वतीने व सेवादल ब्लॉक कॉंग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात युवासेना नाशिक जिल्ह्याच्या वतीने महापालिकेच्या विभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. युवासेना जिल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे यांनी महापालिकेला इशारा दिला की, जर खड्डे तातडीने बुजवले गेले नाहीत तर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. राहुल ताजनपुरे म्हणाले, महानगरपालिका वारंवार सूचना देऊनही दुर्लक्ष करत आहे. नागरिकांच्या जीवाशी असा खेळ सहन केला जाणार नाही. खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत आणि यामुळे होणारी जीवितहानी तत्काळ थांबवली पाहिजे. सिन्नर फाटा परिसरातील नागरिकांमध्ये प्रशासनाच्या या निष्काळजीपणामुळे तीव्र रोष आहे. या घटनेमुळे भविष्यात कोणताही निष्पाप बळी जाऊ नये, यासाठी महापालिकेने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करावी. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख राहुल ताजनपुरे, महाराष्ट्र राज्य विस्तारक किरण डहाळे, उपमहानगरप्रमुख आकाश निकम, युवासेना उपमहानगरप्रमुख अमोल जाधव, युवासेना जिल्हा चिटणीस सचिन ताजनपुरे, बिपीन मोहिते, प्रशांत पगारे आदी उपस्थित होते. दरम्यान, येथील ब्लॉक कॉंग्रेस सेवादलाच्या वतीने मनपा विभागीय अधिकाऱ्यांना सिद्धार्थ गांगुर्डे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. खड्डे त्वरित बुजवले नाही तर अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसू दिले जाणार नाही, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. वसंत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. याप्रसंगी उमेश चव्हाण, पोपटराव हगवणे, ज्ञानेश्वर चव्हाण, सुहास गांगुर्डे, लहू जाधव, झिईद अली, दीपक शिरसाट, प्रकाश चंदनसे, राजू बनसोडे, उमेश दासवाणी, विनायक बत्तीसे आदी उपस्थित होते.

# कुटुंबाकडून तक्रारच नाही

## सहाणे दुहेरी आत्महत्या प्रकरण; कंपनीकडून मौन

**नाशिक । प्रतिनिधी**

- कंपनीवर आरोप, पण कुटुंबाकडून तक्रार नाही
- विजयच्या भावाकडे सखोल विचारपूस
- विजयच्या बँक खाते, कर्जखाते, व्यवहारांची पडताळणी
- घटनेच्या आधी झालेले कॉल डिटेल्सचे विश्लेषण
- शेतजमीन, कौटुंबिक वाद यादृष्टीनेही तपास
- तिन्ही मृत्यूंचा तपास उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे वर्ग
- लवकरच उलगडा होण्याचा पोलिसांना विश्वास

पाथर्डी फाटा येथील सराफनगरात घडलेल्या सहाणे कुटुंबातील दुहेरी आत्महत्या व चिमुकलीच्या खुनाचे मुख्य कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यातच सहाणे कुटुंबाने नामांकित कंपनीच्या कार्यपद्धतीसह छळास कंटाळून चिमुकलीचा खून करत यानंतर आत्महत्या केल्याचा आरोप केला. मात्र या आरोपांबाबत कुटुंब किंवा नातलगांनी इंदिरानगर पोलिसात तक्रार नोंदवली नसून सर्वच प्रकरण संशयास्पद स्थितीत पोहोचत आहे. त्यामुळे आता नातलगांची चौकशी करण्याचा निर्णय झाल्याचे समजते.

विजय माणिक सहाणे (४१), ज्ञानेश्वरी विजय सहाणे (३२) आणि अनन्या विजय सहाणे (१०, तिघे रा. प्रतिगंगा रो-हाऊस) अशी एकाच कुटुंबातील तिघा मृतांची नावे आहेत. विजय आणि त्यांची पत्नी ज्ञानेश्वरी यांनी गळफास घेत आत्महत्या केली. तत्पूर्वी दहा वर्षीय मुलगी अनन्या हिला विषारी द्रव्य, औषध पाजून तोंड चिकटपट्टीने चिटकवून खून केल्याचा धक्कादायक व संशयास्पद प्रकार बुधवारी (दि.१८) उघड झाला. दरम्यान, अनन्याच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झाले नसले तरी शवविच्छेदनानंतर तिचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला आहे. त्याचा अहवाल आल्यावरच अनन्याचा मृत्यू कसा झाला किंवा शहाणे दाम्पत्याने संगनमताने किंवा विजय यांनी अनन्याचा खून कशा पद्धतीने केला हे उघड होणार आहे.

बुधवारी सकाळी सात वाजता अनन्याची स्कूल बस रो-हाऊसजवळ पोहोचली. तेव्हा विजय यांचे वडील माणिक यांनी वरच्या मजल्यावरील बेडरूममध्ये असलेल्या अनन्याला आवाज दिला. मात्र अनन्यासह तिच्या आई-वडिलांनीही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे माणिक यांनी वरच्या मजल्यावर जाऊन खोलीचा दरवाजा ठोठावला. दरवाजा उघडत नसल्याने त्यांनी शेजारच्यांना व दूध विक्रेत्यास बोलावून दरवाजा तोडला. त्यावेळी विजय व ज्ञानेश्वरी यांनी एकाच हुकाला दोन स्वतंत्र गळफास घेतल्याचे दिसले. तर तोंडावर चिकटपट्टी चिटकवलेल्या अवस्थेत अन्यन्या आढळली होती. तर या आत्महत्या प्रकरणात संबंधित कंपनीने अद्याप कुठलीही भूमिका स्पष्ट केली नसून मौन बाळगल्याचे कळते.

### आधी पाहिले गणपती, नंतर जेवण

विजय यांनी पत्नी ज्ञानेश्वरी व मुलगी अनन्या हिला (दि. १६) रात्री आठ वाजेनंतर गणपती पाहण्यासाठी नेले होते. यानंतर तिघांनी हॉटेलमध्ये जेवण केले. त्यानंतर रात्री ११ ते साडेअकरा वाजेच्या सुमारास तिघे घराजवळ आले. त्यांनी आजूबाजूच्या मेडिकलमधून काहीतरी औषधे खरेदी केली. यानंतर रात्री १२ ते पहाटे पाच वाजेच्या आसपास हत्या व आत्महत्येच्या घटना घडल्याचे समोर येत आहे.

### सल्लामसलत करून निर्णय

शहाणे कुटुंब सधन असून मृत विजय यांचा भाऊ संबंधित कंपनीत कार्यरत आहे. तर त्यांचे वडील माणिक हेदेखील सेवानिवृत्त आहेत. तसेच या कुटुंबाची गौळाणे व अन्य भागात मोठी शेतजमीन आहे. त्यामुळे कुटुंब सधन असताना विजय यांनी टोकाचा निर्णय का घेतला, हे समोर आलेले नाही. विशेष म्हणजे विजय आणि ज्ञानेश्वरी यांनी विचारपूर्वक व संगनमताने आत्महत्या व मुलीच्या हत्येचा विचार केल्याचे प्राथमिक तपासात उघड होत आहे.

# १२ टवाळखोरांवर पोलिसांची कारवाई

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील महाविद्यालये, शाळांबाहेर तरुणी व अल्पवयीन मुली दिसताच त्यांच्यासमोर भाईगिरी करून धूमस्टाईल बाईक चालवणाऱ्या टवाळखोरांची मस्ती पोलिसांनी गुरुवारी (दि.१९) उतरवली. परिमंडळ एकच्या हद्दीत अचानक ही कारवाई करण्यात आली. विशेष म्हणजे पोलीस निरीक्षकांनी आपापल्या हद्दीतील महाविद्यालयांत जाऊन प्राचार्य व शिक्षकांशी संवाद साधून अडचणी, समस्या जाणून घेतल्या.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या आदेशाने परिमंडळ एकचे उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांच्या सूचनेने ही कारवाई करण्यात आली. झोन एकच्या कार्यक्षेत्रातील पंचवटी, म्हसरूळ, आडगाव, सरकारवाडा, भद्रकाली, मुंबईनाका व गंगापूर पोलिसांच्या हद्दीत सकाळी साडेअकरा ते दुपारी दोन वाजेदरम्यान विशेष मोहीम राबवण्यात आली.

मोहिमेत पंचवटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड, आडगावचे वरिष्ठ निरीक्षक सचिन खैरनार, भद्रकालीचे वरिष्ठ निरीक्षक गजेंद्र पाटील, मुंबईनाक्याचे वरिष्ठ निरीक्षक संतोष नरुटे, सरकारवाडाचे सुरेश आव्हाड, गंगापूरचे सुशील जुमडे, म्हसरूळचे अतुल डहाके यांनी इतर अधिकारी, अंमलदार व दामिनी पथकांनी कारवाई केली. यात पथकांनी आपापल्या हद्दीतील शाळा, कॉलेजबाहेर अचानक फेरफटका मारून कारवाई केली. तेव्हा कॉलेजजवळ टाईमपास, भंपकपणा आणि नाहक फिरणाऱ्यांसह स्टंटबाजी करणाऱ्यांना पकडून कारवाई केली. तर छेडछाड करताना आढळलेल्या टवाळखोरांना ताब्यात घेत पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर कारवाई केली.

| येथे तपासणी | सापडलेले टवाळखोर |
|---|---|
| पंचवटी | १० |
| म्हसरुळ | १२ |
| आडगाव | १५ |
| भद्रकाली | १२ |
| मुंबईनाका | ९ |
| सरकारवाडा | १४ |
| गंगापूर | २० |

# विसर्जनासाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू

**नवीन नाशिक । प्रतिनिधी**

अंबड येथील युवकाचा गणेश विसर्जन करताना चुंचाळे घरकुल भागातील खदानीत पडून मृत्यू झाला. मनोज काळू पवार (१८, रा. स्वामीनगर, अंबड) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

अंबड येथील स्वामीनगर येथे काळू पवार कुटुंबासमवेत भाड्याच्या घरात राहतात. मंगळवारी सायंकाळी त्यांचा मुलगा मनोज काळू पवार हा परिसरातील सात ते आठ युवकांसमवेत गणेशमूर्ती विसर्जन करण्यासाठी चुंचाळे घरकुलालगत असलेल्या खदानीत गेला होता. खदानीच्या ठिकाणी मनोजचा पाय घसरल्याने तो खदानीच्या खड्ड्यात पडला.

यावेळी त्याच्या समवेत असलेल्या दोघा-तिघांनी त्वरित खदानीत उडी मारली परंतु मनोज मिळून आला नाही. त्यानंतर बुधवारी सकाळी अग्निशमन दलाच्या जवानांनी खदानीत पुन्हा शोध सुरू केला असता ११ ते साडेअकरा वाजता त्याचा मृतदेह मिळून आला. त्याच्या पश्चात आई, वडील व बहीण असा परिवार आहे. मयत मनोजवर त्याच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रकरणी ग्रामीण पोलिसांनी नोंद केली आहे.

# कामगाराची लूट; मोपेडही पळवली

**नाशिक । प्रतिनिधी**

पंचवटीतील गणेशवाडीतून शरणपूररोड येथील बँकेत पैशांचा भरणा करण्यासाठी जाणाऱ्या खासगी कामगाराकडील सव्वाचार लाखांची रोकड व मोपेड चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. पंचवटी पोलिसांनी अवघ्या काही तासांत रोकडसह अल्पवयीन संशयिताला ताब्यात घेतले असून त्याचा साथीदार पसार आहे. पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

संजय बाबूलाल सोळंकी (रा. मधुबन कॉलनी, पंचवटी) यांच्या फिर्यादीनुसार, ते प्रफुल्ल जैन यांच्या प्रशांत मार्केटिंग, प्रशांत डिस्ट्रीब्युटर्स यांच्या कंपनीत नोकरीला आहेत. बुधवारी (दि. १८) सकाळी ते नानावलीतील कंपनी कार्यालयात गेल्यानंतर मालक जैन यांनी कार्यालयातील ४ लाख १७ हजारांची रोकड शरणपूररोडवरील एका बँकेत जमा करण्यास सांगितले. त्यानुसार सोळंकी हे मोपेडने (एमएच १५ सीएफ १२१४) गणेशवाडीतून जात असताना दोघा संशयितांनी त्यांना अडवले. त्यावेळी संशयितांनी सोळंकी यांच्याकडील रोकडची बॅग आणि मोपेड अशी ४ लाख १७ हजारांची रोकड व १५ हजारांची मोपेड हिसकावून पोबारा केला. घटनेची माहिती पंचवटी पोलिसांना देण्यात आली. त्याचवेळी बीटमार्शल नवनाथ रोकडे, विष्णू जाधव हे परिसरात गस्तीवर असल्याने त्यांनी घटनास्थळाकडून संशयितांचा शोध सुरू केला. काही मिनिटांमध्ये हिसकावून नेलेली मोपेड दिसताच पोलिसांनी पाठलाग केला. त्यावेळी एक संशयित मोपेड सोडून पसार झाला, तर दुसऱ्याला ताब्यात घेतले. तो अल्पवयीन संशयित असून, त्याच्याकडून ३ लाख २६ हजारांची रोकड व मोपेड जप्त करण्यात आली. याप्रकरणी पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल असून, पसार संशयिताचा पोलीस शोध घेत आहेत. गुन्ह्याचा तपास सहाय्यक निरीक्षक विलास पडोळकर करत आहेत.

# डीजेचा दणदणाट महागात

## मंडळ अध्यक्षांसह डीजेचालकांवर गुन्हे

**नाशिक । प्रतिनिधी**

विसर्जन मिरवणुकीत नियमांचे उल्लंघन करत डॉल्बी साऊंड सिस्टिम वाजवून ध्वनिप्रदूषण करणाऱ्या तसेच विनापरवानगी मिरवणूक काढणाऱ्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह डीजे चालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विसर्जन मिरवणुकीत मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांची पूर्वपरवानगी घेण्याचे आदेश होते. तसेच ध्वनिप्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले होते. मात्र बहुतांश मंडळांनी आवाजाची तीव्रता मर्यादित ठेवली नव्हती. मिरवणुकीत पोलिसांनी आवाजाची तीव्रता मोजत त्याची नोंद घेतली होती. तसेच वेळोवेळी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सूचना देत आवाजाची तीव्रता कमी करण्यास सांगितले होते. मिरवणूक संपल्यानंतर पोलिसांनी ध्वनिप्रदूषण करणाऱ्या मंडळांच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांसह डीजे चालकांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

### यांच्यावर गुन्हे नोंद

नाशिकरोड, उपनगर, सरकारवाडा पोलीस ठाण्यांमध्ये प्रत्येकी १-१ गुन्हा दाखल आहे. त्यानुसार युनायटेड महिला सोशल फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष दीपा अमोल कमोद यांच्याविरोधात सरकारवाडा पोलीस ठाण्यात साऊंड सिस्टिम लावून नियमभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर नाशिकरोड पोलिसांनी हिंदशक्ती मित्रमंडळाचे पदाधिकारी मंगेश गवारे, विवेक बर्डे, शुभम बर्डे यांच्यासह साऊंड सिस्टिम मालक शुभम बर्डे यांच्याविरोधात विनापरवानगी मिरवणूक काढल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे. तर उपनगर पोलिसांनी जेलरोडचा राजा मित्रमंडळाचे पदाधिकारी प्रशांत गामणे, सुमित साठे यांच्यासह डीजेचालक उमेश कुमावत यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# भाजप नेत्यांना अटक करावी

## कॉंग्रेसची मागणी; बेताल विधानांचा समाचार




**नाशिक । प्रतिनिधी**

भाजप व त्यांच्या मित्रपक्षांचे नेते हे देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात बेताल वक्तव्य करून जीवे मारण्याची धमकी देत आहेत. दररोज चिथावणीखोर भाषण करून राहुल गांधी यांच्या जीवाला कसा धोका होईल, याचा कट रचला जात असून त्या विरोधात कॉंग्रेसने आक्रमक भूमिका घेत बेताल विधाने करणाऱ्या भाजप नेत्यांना अटक करा, या मागणीसाठी जोरदार आंदोलन केले.

एनएसयूआय व कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी कॉंग्रेस भवन येथे गुरुवारी (दि.१९) निषेध आंदोलन केले. यावेळी शहराध्यक्षांनी जोरदार टीका केली. कॉंग्रेस पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात संशय आहे. अशा बेताल वक्तव्य करणाऱ्या नेत्यांना त्वरित अटक करून त्यांची सखोल चौकशी केली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. खा. राहुल गांधी हे एक संविधानिक पदावर आहेत. त्यामुळे त्यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या या नेत्यांना त्वरित अटक झाली पाहिजे व कडक शिक्षा झाली पाहिजे, असे मत व्यक्त केले. याप्रसंगी भारतीय जनता पक्ष व नेत्यांचा धिक्कार असो, राहुल गांधी आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी प्रदेश कॉंग्रेस सचिव राहुल दिवे, नगरसेविका आशा तडवी, शहर युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष स्वप्निल पाटील, जिल्हा एनएसयूआयचे अध्यक्ष अल्तमश शेख, शहर सेवादलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर, अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष संतोष ठाकूर, जिल्हा कॉंग्रेसचे उपाध्यक्ष आप्पा गवळी उपस्थित होते.

## निधन वार्ता...



### मंदा देशपांडे

**नाशिक ।** चांडक सर्कल येथील रहिवासी मंदा मुकुंद देशपांडे (८२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे, देशपांडेज ऑप्टीव्ह्यूचे संचालक मिलिंद व मकरंद देशपांडे यांच्या त्या आई होत.



### कमल प्रयागी

**नाशिक ।** कामटवाडेमधील अंबिकानगर येथील रहिवासी कमल प्रमोद प्रयागी (७३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, जावाई, सून, नात, नातवंडे असा परिवार आहे. त्या राहुल प्रयागी यांच्या मातोश्री होत.



### रमेश जगताप

**तारुखेडले ।** येथील रमेश एकनाथ जगताप (६७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वै. एकनाथ रामजी जगताप यांचे चिरंजीव तर पत्रकार उद्धव जगताप यांचे ते चुलते होत.



### चिंधू गंभीरे

**धारणगाव वीर ।** येथील प्रगतिशील शेतकरी चिंधू शिवराम गंभीरे (८०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, तीन भाऊ, पाच बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### दशरथ कुलथे

**नाशिकरोड ।** येथील रहिवासी दशरथ नारायण कुलथे (८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, चार सुना, मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. नाशिकरोड वृत्तपत्र विक्रेता सेवाभावी संस्थेचे कार्याध्यक्ष उल्हास कुलथे यांचे ते चुलते होत.



# क्लासिफाईड /सुपरमार्केट

### पाहिजेत

**मराठी**/इंग्रजी कोर्टाचा अनुभव असलेले टायपिस्ट फुल टाईम पाहिजेत. संपर्क : 9881047061.
(28/09-BK-5354)

### प्लॉट विक्री

**बंगलो** विकणे - गंगापूररोड सावरकरनगर, नवश्या गणपती एरिया, गंगापूररोड, चांदशी प्लॉट विकणे, २/३/४ BHK फ्लॅट विकणे- गंगापूररोड, चांदशी व सुलावाईन रोडफ्रंट प्लॉट विकणे. 9637915599, 8530683111.
(BK-5050)

जाहिरात छोटी ! किमया मोठी !!

### दारुबंदीचा गुरुमंत्र

**द ग्रेट** साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे अॅडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... अॅडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/25)
(CRINV-23-24JL/CRG00555)

### व्यसनमुक्ती

**गॅरंटीने** सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www. drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/25)
(CRINV-23-24JL CRG00554)

### सर्व आजारांसाठी

**जुनाट** सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट अॅलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752.
(09/01/25)
(CRINV-23-24JL/CRG00556)

### नावात बदल

**My** old name SHEIKH MO SOHEB HARUNSHARIF has been changed to my new name MOHD SHOEB SHAREEF SHAIKH as per Aadhar No. 7686 4530 5245. (BK-5356)

**I** Gitadevi Shriram Pandit my Son's Pradip Shriram Pandit. in his 10th Marksheet my name is Geetadevi wrongly mentioned correct name is Gitadevi Shriram Pandit. as per Documents. (BK-5355)

### वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

◆ जाहिरात विभाग, दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६ ◆नाशिकरोड : प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६ ◆ निफाड : मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११०० ◆दिंडोरी : दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८ ◆ मालेगांव : पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळ्याजवळ. ०२५५४-२४३४६२२ ◆ सिन्नर : दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.